# ईसाप

## गटारी स्पेशल



एकचं प्याला !!!


संपादिका-

सुप्रिया (जोशी) जाधव , पुणे.

रेणुका (रेपाळ) खटावकर , पुणे.

अतिथी संपादक - सुधीर मुळीक , मुंबई.

## !!! गटारी प्रतिज्ञा !!!

बार माझा देश आहे....

सारे बेवडे माझे बांधव आहेत...

माझ्या ब्रँडवर माझे प्रेम आहे.......

बार मधील सर्व प्रकारच्या अल्कोहोलचा मी मान ठेवीन...
माझ्या बारमध्ये आनंदाने व विविधतेने झुलणा-या

बेवडयांचा मला अभिमान आहे.....

माझा बार आणि माझी दारु यात माझे सौख्य सामावले आहे .

--- हैप्पी गटारी---

## अतिथी संपादकाच्या लेखणीतून.......

गटारीमहोत्सवानिमीत्त आपणासं या ओल्या पार्टीचं खाआआस आमंत्रण!
अहो विचार कसला करताय ? सामिल व्हा !!!

स्थळ - देशी कोंबडी कट्टा ,

पत्ता – १०१ , गटार गल्ली , ई - स्टाप , रांगोळी नाका ,

मुक्काम पोस्ट - ई साहित्य प्रकाशन .

निमंत्रक - ई - स्टाप गुत्ता आणि मंडळी !!!
( विशेष सुचना - येताना रांगोळयांपासून जपून येणे ,

सावधान ! सगळी गटारे उघडी आहेत , नो भरचूक !!! )

“ आषाढ अखेरी हर्ष मानसी गटार भरले चोहीकडे ,

क्षणात पेले भरभर रिचवे क्षणात कोणी उलटून पडे !!”


चिअर्स !!!

प्रत्येक दारु पिणा-या मांसाहारी माणसाचा वर्षातला सगळयात मोठा सण म्हणजे गटारी अमावस्या ! श्रावण न पाळणा-यांना देखिल ही एक पर्वणीचं असते जणू , असो!!!

दुष्काळात तेरावा......म्हणून कि काय या महिन्यातील आषाढी एकादशीने नेमका बुधवार नि गुरुपौर्णिमेने नेमका रविवार गाठला ...ऊत्पादन शुल्कात झालेली हि घट भरुन काढण्यासाठी महाराष्ट्रातील माझ्यासारखे करदाते मागे सरतील तरचं नवल!

मुळात दारु कधी वाईट नसतेचं मुळी , एवढा प्रचंड कर सोसुन फ़क्त देशाच्या विकासासाठी हिच वाईट दारु आम्ही व्हाईट पैशाने पित असतोच नं ? हं ,आता या दिवशी होणारी कोंबड्यांची प्रचंड कत्तल हा चर्चेचा विषय होऊ शकेल . हो आणि कोंबडी या उडता न येणा-या पक्ष्याएवढा त्यागमूर्ति दुसरा कोणीही प्राणिमात्र या भुतलावर नसेल . हे त्यागाचे धडे आम्हालाही मिळावे हा कोंबड्या खाण्यामागचा आमचा एकमेव प्रामाणिक हेतु असतो ! कदाचित या कोंबड्यांची उडण्याची ईच्छा अर्धवट राहील्यानेचं दारु सोबत तंगड्या चापणा-या माणसाला हवेत उडल्याचे भास होत असावेत ! या अर्थाने हया कोंबड्यांची ही ईच्छाचं आम्ही पूर्ण करत असतो.

कोंबडीचा रस्सा , मटणाची साथ ,
बांगड्याचा तुकडा , बिर्याणीचा भात !!
मांदेलीची कढी आणि सजलेलं ताटं ,
खाऊन घ्या सगळं श्रावण यायच्या आत !!!





हे झालं आमचं बाटली आणि कोंबडी प्रेम पण या सोबतच यंदाच्या ‘गटारी’ची लज्जत द्विगुणीत करणारा हा अंक पिणा-यांना ,न पिणा-यांना ,लपुन-छपुन पिणा-यांनाही तेवढीच किक देवून जाईल हे मात्र अगदी खरे....दारु-शप्पथ !!!

न पिणा-यांनी मात्र जरा जपुनचं कारण जरी या मैफ़िलीची सुरवात अंकाच्या नावाप्रमाणे एकाचं पेल्याने होते तरीही हा पूर्ण अंक म्हणजे एक अख्खा खंबाच होय ! या अंकात अगदी स्वदेशी माणसांसाठी भांगेतल्या अभंगा पासून हरएक विदेशी ब्रँडची सोय केलेली आहे .सगळे ब्रँड एकत्रित करुन मस्त कॉकटेलची हवीहवीशी झिंग अनूभवण्याचा मोका गमावण्याचा अविचारही करु नका .....

जेष्ठ जातो ग्लासात बुडून
आषाढ मात्र सलत रहातो !!
गटारीला घेतो ईतके पेले
मग श्रावणभर हालत रहातो !!!

चला तर मग.......हे सगळे मदमस्त प्याले ओठांना लावुया.......आणि हो आम्हाला ह्यांची चव नक्कक्कक्की कळवा......अर्थात हँग्र ओव्हर ऊतरल्यावरच हं !!!
मग सुरु करताय नं ???


चिअर्स !!!

# !!! भांगेतले अभंग !!!



तुझ्या  अवती भवती
पिंगतसे माझे मनं
झिंगतसे माझे तनं
घोटापायी !!

डोळे मिटताचं दिसे
तुझा कमनिय बांधा
(तिथे होतो सारा वांधा )
काय सांगू !!



चव तुझी चाखण्याला
ओठ अधिर हावरे
बोटं शिवशिव करे
शिव ! शिव !!

बुच तुझे उघडीता
अश्शी लाळ टपकते
जीवामधे जान येते
टल्ली म्हणे !!

-टल्ली.





नको बारवाल्या , दारु असा पाजू
तोल हा सर्वथा , जावू पाहे !!

कमालीचे धाडस , आज हे जाहले
पिऊन टुन्न , झालो मित्रा !!

घराचाही ठाव , न दिसे मम नयनी
बदडुनी काढीती , आई-बाप !!

उलटुनि आज , जाहलो बेहोश
घेई या मित्रास , घरामधे !!

- चंद्रजीत.

# दारुचा पाढा......

दारु एके दारु , बैठक झाली सुरु...
दारु दुणे ग्लास , मज्जा येई खास...

दारु त्रिक वाईन , वाटे कसे फ़ाईन...
दारु चोक्क बिअर , टाका पुढचा गिअर...

दारु पंचे रम , विसरुन जाऊ गम...
दारु सख्खे ब्रॅंडी , हाणा चिकन हंडी...

दारु सत्ते व्हिस्की , कॉकटेल करता रिस्की...
दारु अठ्ठे चिवडा , चखणा शेव-चिवडा...

दारु नव्वे कंट्री , मारा परत ऐंट्री ...
दारु दाहे प्याला , स्वर्ग सुखी नहाला..

---------------.







रंगांबिरंगी

४० हजार रुपयांचा कुठलातरी रॉयल पेंट लावाला तर घर रंगांबिरंगी दिसु लागते ......

अरे यार ,

४०० रुपयांची रॉयल स्टॅग  पिऊन पहा....
सगळं जग रंगांबिरंगी दिसु लागेल !!!



## !!! मद्य  आणि वाद्य !!!

‘वाईन’ असते वायोलिन सारखी...
वेदनेच्या तारा हळुवार छेडणारी...!
श्वासामधे विरघळुन काळजाला भिडणारी...
उदास उदास कातरवेळी...
वर वर बिनधास्त... आत आत हळहळणारी...!



‘रम’ असते तबल्यासारखी ...
सगळ्या संवेदना क्षणातं जागवणारी...!
एका नादखुळ्या स्पर्शानेच...
धरेवरुन आभाळात झेपावणारी...!
रात्रभर तालाच्या आवर्तनात घुमुन...
पहाटे  समेवर येणारी...!

‘बिअर’ असते मंदधुंद बासरी...
ओठांनी स्पर्शिली की ओठांपेक्षाही लाजरी...
नसांनसातून वाहणारी ,
अलगद आणि  लहरी !





'शॅम्पेन' असते मॅच जिंकल्यावर
निनादणारा उत्स्फुर्त बिगुल !
कुणी दखल घेतली तर ठीक
नाहीतर आपल्यातचं मश्गुल !

कॉच' म्हणजे झटका देणारी गिटार...
कलत्या रात्री , भलत्या क्षेत्री ,
झुलत्या चंद्राबरोबर...
प्रत्येक ठोक्याला डोक्यात चढणारा थरार...!

मद्य नसेल तर वादयांचा नुसता कोलाहल...
वाद्य नसेल तर मद्य जाचक , जहरी हलाहल...
दोन्ही नसतील तर........
अवघे जगचं सुनी-सुनी मैफ़िल!!!

-गौरी.



# सांगा कसं प्यायचं ?



सांगा कसं प्यायचं ?
लपत-छुपत की मित्रांसोबत...
तुम्हीचं ठरवा !

ग्लास भरुन  तुमचे दोस्त
एखादा पेग देतात ना ?
येता-जाता रस्त्याने
लोक शिव्या घालतात  ना ?
शिव्या खात बसायचं कि मित्रांसोबत हसायचं ?
तुम्हीचं ठरवा !




श्रावणमासात दारु
जेव्हा कुठेचं सापडत  नसते
तुमच्या स्वप्नी  दारु देवता
बाटली घेऊन ऊभी असते
श्रावणमास पाळायचा कि दारु पीत लोळायचं
तुम्हीचं ठरवा !



पाय खड्ड्यात पडत असतात
हे अगदी खरं असत...
घरची वाट सापडत नसती
हे ही काय खरं नसतं?
खड्ड्यामधेचं पडायचं कि घराकडे वळायचं
तुम्हीचं ठरवा !

बाटली अर्धी ऊरली आहे
असं सुध्दा म्हणता येईल...
रात्र बरीचं सरली आहे
असं सुध्दा म्हणता येईल
बाटलीमधे बुडायचं कि गप्प जाऊन पडायचं...
तुम्हीचं ठरवा !

-काव्यसागर.




एका बारमधील सुचना –

जर तुम्ही काही विसरण्यासाठी ईथे आला असाल तर.....
कृपया आमचे बिल आधी देवून टाका......

ते सांगतात दारु हे विष आहे पिऊ नका !!!

आम्ही म्हणतो आम्ही शंकर आहोत .......
विष पचवणारे !!!








# आज सुगंधी गटार झाले....

रम व्हिस्की वर
मोह गावठी
कळकट भजिया
मळकट ग्लासे
खच्चून खाऊ
तळकट मासे

इंग्लिश ब्रँड
मुर्गी गावठी
मित्र टपोरी
इब्लिस कार्टी
टकार टवणे
धटींग पार्टी



कुठे बावळट मुले शहाणी
वरण भात
बुळकट भेंडी

अरे एकदा तरी झिंग रे !
बेशुध्दीतचं
शुध्द करा मन
सुगंधी करुया
सारे गटारे .

-टल्ली.

# अन आम्ही दारु सोडली......

जेव्हा आम्ही पहिल्यांदी घेतली
बापाने मस्त  खरड्मपट्टीं  काढली
डुकरासारखी कुठे ढोसली ?
डुक्कर दारु पित नाही असे आमच्या चेह-यावरचे भावं

आई ; पण प्रत्येक पिणा-याचे डुक्कर हेचं  नावं !
.....अन आम्ही दारु पहिल्यांदी सोडली .



एकदा ‘ती’चे लग्न ठरले
म्हंटल त्यापेक्षा मरुन जावू
ती म्हणाली आपण पळून जावू
दुस-या दिवशीचं सगळ ठरलं...
अन त्या दिवशी दारु प्याली
तिस-या दिवशी जाग आली
तोपर्यंत प्रेमाची राख होती झाली
घरी  बाप दयाद्र बघत होता
आई ; परवा घेतली नसती तर ती आज माझी सुन असती...
अन  आम्ही दारु परत सोडली .



नंतर आमचही लग्न झालं
लग्न झाल्यावर एकदा ऐकेनात मित्र
मग हाती धरलं छोटस पात्र
घरी बायकोने जवळ नाही घेतला
"तू नाही  राहीला आधीसारखा"
जरा वागू दे की नव-या सारखा
तरीपण खोलीबाहेर काढला ...

बाप मंद हसत होता
साला काय चुकलं ? सगळ जग पितं
आई;पण त्यातल किती तुझ्या बायकोपाशी येतं
अन आम्ही दारु परत सोडली.

आई जेव्हा निघुन गेली
आम्ही तीला पोहचवून आलो
पहिल्यांदा आई नसलेल्या घरात गेलो
पाहतो तर समोर वाईन आणि व्हिस्की
डोक्यात तिडीक ..साला ये मजाल किसकी ?
समोर ही ऊभी नि हातात चिट्ठी
सुनेकडून फ़क्त सुनेसाठी.....
'ईकडे' येण्याआधी.....

-विनायक.

कितो हा घोर अन्याय .....

पण......

१ लिटर – १००० मिली.   १ खम्बा – ७५० मिली.

अर्धा लिटर- ५०० मिली.   १ हाफ़ – ३६० मिली.

पाव लिटर – २५० मिली.   १ क्वार्टर- १८० मिली.

बघा, बिचा-या दारुड्यांना सगळेचं फ़सवतात !!!





# एक क्वार्टर कमी पडते ......

दारु काय गोष्ट आहे
मला अजुन कळली नाही
कारण प्रत्येक पिणारा म्हणतो
मला काहीचं चढली नाही

सर्व सुरळीत सुरु असताना
लास्ट पेगपाशी गाडी अडते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते

पिण्याचा प्रोग्रॅम म्हणजे जणु
विचारवंतांची गोलमेज परिषदचं भरते
रात्री दिलेला शब्द प्रत्येकजणं
सकाळच्या आत विसरते

मी ईतकीचं घेणार असा
प्रत्येकचा ठरलेला कोटा असतो
पेग बनवणारा त्या दिवशी
जग बनवणा-या पेक्षा मोठा असतो

स्वतःच्या स्वार्थासाठी आग्रहाने
पिण्याच्या कार्यक्रमांची झोड उठते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते

पिण्याचा कार्यक्रम पिणा-यासाठी
प्रत्येकवेळी एक नवे पर्व असते
अॅकेडेमिक्सपेक्षाही लोकांसाठी
पिण्याची क्षमता हेचं सर्वस्व असते

आपण हीचं घेतो म्हणत
एकमेकांचे ब्रँड्प्रेम जागवतात
वेळ आली आणि पैसा नसला
कि देशीवरही तहान भागवतात

शेवटी काय
दारु दारु असते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते





पिणा-यांमधे ‘प्रेम’ हा
चर्चेचा पहिला विषय आहे
देवदासचे खरे प्रेम पारो की दारु
मला अजुन संशय आहे

प्रत्येक पेगमधे तीची
आठवण दडली असते
हा बाटलीत बुडलेला असतो
ती चांगल्या घरी पडलेली असते

तीच्या आठवणीत थर्टीची लेवल
लगेच सिक्स्टीला पोहोचते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते

चुकुन कधीतर गंभीर
विषयांवरही चर्चा चालतात
सर्वजण मग पी.एच.डी.
केल्यासारखे वागतात

प्रत्येकला वाटते की त्यालाच
या मधले जास्त  कळते
ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा
गावच्या पोटनिवडणुकीकडे वळते

जसा मुद्दा बदलतो
तशी चर्चा वाढते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते

फ़ेकणे , मोठेपणा दाखवणे याबाबतीत
ह्यांचा कोणीही हात धरणारा नाही
एरवी सिंगल समोसा खाणारा
गोष्टीत पिझ्झाशिवाय खात नाही

पैशाचं काय ते फ़क्त
खर्च करण्यासाठीच असतात
पेगजवळ झालेली अशी गणीते
सकाळी चहाच्या कटींगपाशी फ़सतात





रात्री थोडी जास्त झाली
मग त्याला कळते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते

यांच्या मते मद्यपान हा
आयुष्याचा महत्वाचा पार्ट आहे
बियर पिण्यामागे सायन्स
तर देशी पिण्यामागे आर्ट आहे

यामुळे धीर येतो ताकद वाढते
एक न्याराच थाट असतो
आयुष्यभराचा मावळा माणुस
त्या क्षणी राजा असतो

याच्यामुळेच आपल्याला घरच्या
चिवड्याचे महत्व कळते
दर पार्टीच्या शेवटी
एक क्वार्टर कमी पडते.

-सचिन .

# भेसळ .....

पिऊन थोडी चढणार असेल
तरच पिण्याला अर्थ आहे ,
एव्हडी ढोसुन चढणार नसेल तर
अख्खा खम्बा व्यर्थ आहे

मी तसा श्रध्दावान
श्रावण नेहमी पाळतो ,
श्रावणात फ़क्त दारु पितो
नॉनव्हेज मात्र टाळतो.

ज्याची जागा त्याला दयावी
भलती चुक करु नये ,
पिताना फ़क्त पित रहावे
चकण्याने पोट भरु नये .



आम्ही कधीच दारुमधे
दु:ख आमचं बुडवत नाही ,
दारु नेहमी शुध्द्चं ठेवतो
भेसळ आम्हाला आवडत नाही.

-------------.





# इज्जत !!!

दारुने नशा होते.....

नशेने उत्साह वाढतो......

उत्साहात मेहनत वाढते......

मेहनतीने पैसा वाढतो......

पैशाने इज्जत वाढते.

म्हणजेचं......

इज्जत कमवायची असेल तर दारु पिणे आवश्यक आहे!!!








भडक काव्य रचतो असे लोक म्हंती ,
कडक बात करतो असे लोक म्हंती !

लङ्कपनच आहे सदाचेच याचे ,
सडक छाप दिसतो असे लोक म्हंती !

लपकतो असा बाटली दिसली की ,
गटक करुन पितो असे लोक म्हंती !

लुढकतो जरी पावशेरात जेव्हा ,
(च...च...)मकदार लिहीतो असे लोक म्हंती !

चिपकता कुणाला असा येई वास ,
सरकून बसतो असे लोक म्हंती !

खनक पैंजणाची समोरुन जाता ,
टपक लाळ गाळतो असे लोक म्हंती !



पचकं थुंकतो खाऊनी एक सो बीस ,
सडक लाल करतो असे लोक म्हंती !

फ़टक हाणता कानशिलात पांडू ,
तडक पाय धरतो असे लोक म्हंती !

नरक लाभु दे वा मिळो स्वर्ग मरता ,
फ़रक काय पडतो असे लोक म्हंती !


धमक छातीमध्ये जरी खूप याच्या ,
वचक्कून असतो असे लोक म्हंती !

लटकवील केव्हा न याचा भरोसा ,
खचकलाचं असतो असे लोक म्हंती !

भुलक्कड किती नाम विसरे ना चेहरा ,
झट्क्कन बदलतो असे लोक म्हंती !

सणक एक चढताच डोक्यात टल्ली ,
गझक "पाडतो" असे लोक म्हंती !

----------------टल्ली.




एकूण होणा-या अपघातांपैकी दहा टक्के अपघात
दारुमुळे होतात.......

म्हणजे नव्वद टक्के अपघात दारु न पिणा-यांमुळे होतात.

मग न पिणा-यांनी रस्त्यातून बाजुला होवून
पिणा-यांना का रस्ता देवू नये !!!

हे........हे........हे........







# तळीराम.....

दारु पिताना मी कधीचं रिस्क घेत नाही
मी संध्याकाळी घरात येतो तेव्हा बायको स्वयंपाक करत असते,
शेल्फ़मधील भांड्यांचा आवाज बाहेर येत असतो,
मी चोरपावलाने घरात येतो ,
माझ्या काळया कपाटातून बाटली काढतो,
शिवाजीमहाराज फ़ोटोतून बघत असतात ,
तरी या कानाचा त्या कानाला पत्ता लागत नाही
कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!१!! पेग...

वापरात नसलेल्या मोरीतल्या फ़ळीवरुन मी ग्लास काढतो ,
पटकन एक पेग भरुन अस्वाद घेतो ,
ग्लास धुऊन पुन्हा फ़ळीवर ठेवतो ,
अर्थात बाटलीही काळया कपाटात ठेवतो ,
शिवाजीमहाराज मंद हसत असतात ,
स्वैपाकघरात डोकावून बघतो ,
बायको कणीकचं मळत असते ,
या कानाचा त्या कानाला पत्ता लागत नाही ,

कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!२!! पेग...

मी – जाधवांच्या मुलीच्या लग्नाचं जमल का गं ?

ती – छे ! दानत असेल  तर मिळेल नं चांगल स्थळ !

मी परत बाहेर येतो , काळ्या कपाटाच्या दाराचा आवाज होतो ,

बादली मात्र मी हळूचं काढतो ,

वापरात नसलेल्या फ़ळीच्या मोरीवरुन ग्लास काढतो ,
पटकन पेगचा अस्वाद घेतो , बाटली धुऊन मोरीत ठेवतो ,

काळा ग्लासपण कपाटात ठेवतो ,

तरी या कानाचा त्या कानाला पत्ता लागत नाही ,

कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!३!! पेग...

मी - अर्थात जाधवांच्या मुलीचं अजून काही लग्नाचं वय झाल नाही!

ती - नाही काआआआआय ! अठ्ठावीस वर्षांची घोडी झालीय म्हणे...
मी - (आठवून जीभ चावतो ) अच्छा अच्छा....

मी पुन्हा काळ्या कपाटातून कणीक काढतो ,
मात्र कपाटाची जागा आपोआप बदललेली असते ,

फ़ळीवरुन बाटली काढुन पटकन मोरीत एक पेग मारतो ,

शिवाजीमहाराज मोठठ्याने हसतात ,

फ़ळी कणकेवर ठेऊन,
शिवाजींचा फ़ोटो धुऊन मी काळ्या कपाटात ठेवतो,
बायको गॅसवर मोरीचं ठेवत असते ,

या बाटलीचा त्या बाटलीला पत्ता लागत नाही ,

कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!४!! पेग...





मी-(चिडून)जाधवांना घोडा म्हणतेस?
पुन्हा बोललीस तर जिभचं कापून टाकेन तुझी!
ती - उगीचं कटकट करु नका...
बाहेर जाऊन गप्प पडा...
मी कणकेमधुन बाटली काढतो ,
काळ्या कपाटात जावून एक पेग मळतो,
मोरी धुऊन फ़ळीवर ठेवतो ,
बायको माझ्याकडे बघत हसत असते ,
शिवाजीमहाराजांचा  स्वैपाक चालुचं असतो ,
पण या जाधवांचा त्या जाधवांना पत्ता लागत नाही ,
कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!५!! पेग...

मी परत स्वैपाकघरात जातो , हळुचं फ़ळीवर जाऊन बसतो ,
गॅसही फ़ळीवरचं होता ,
बाहेरच्या खोलीतून बाटल्यांचा आवाज येतो ,
मी डोकवून बघतो....बायको मोरीत दारुचा अस्वाद घेत असते ,
या घोडीचा त्या घोडीला पत्ता लागत  नाही ,
अर्थात शिवाजी महाराज कधीचं रिस्क घेत नाहीत .....
जाधवांचा स्वैपाक होईपर्यंत ....
मी फ़ोटोतुन बायकोकडे बघत हसत असतो .....
कारण मी कधीचं रिस्क घेत नाही !!६!! पेग...

-----------.

मी आहे ना !!! (हिंदीतलं टुकार दिग्दर्शन आणि भिकार कन्सेप्ट असलेलं
"मै हु ना!" नाही बरं का .....!)

हे वाक्य कुठे कुठे एकु येते याची जर लिश्ट केली तर एक नावं हमखास सापडेल गुत्त्याच्या टेबलवर ...कसं ? हा खालचा संवाद बघा ओळखीचा वाटतोय का ???

बळी – (तोंडावर टिपकागद लावत...) ए बस आता ...अजून नाही.

तळी- (उचकी दाबत आणि सर्दी नसली तरी नाक ओढुन ) गप्प रे घे.....

मी आहे ना! घे तु...

बळी –अरे बाप असेल घरी.... लौकर येणार होता.

तळी- (चकणा रजनिकांतसारखा अगदी तोंडात फ़ेकत.....त्यातला अर्धा ...टेबलाखालचं मांजर खातय...) चल रे फ़ाट्या...घे...घे..

मी आहे ना!.

बळी –अरे गाडी आणलीय मी ...आणि तुला पण सोडायचय भा....ऊ

तळी- चल रे भा...(ईथे ऊ नाही) मी आहे मी चालवेन ... तु घे... मी आहे ना!.

बळी –

तळी-



असा जो काही टेबल टेनिसचा टॉक टॉक चालतो ...त्यात बळीकडे कितीही विविधता असली तरी ...तळीचा तोचं तो शॉट असतो ...आणि गंमत म्हणजे बळी हरतो ही...

शेवटी बारवाल्यावरच पाळी येत असते त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्याची..

कारण गटारीला गटर भरुन वहायला हवी ..... हॉय की नाही ???

-प्राजक्त.



'एकचं प्याला' म्हणता म्हणता.....

किती रिचवले रे हे प्याले !!

नशा चढली शब्दांनाही....

तेही जरा झिंगलेले !!!

-सचिन काकडे.



# दारू पिणे आरोग्यास हानिकारक आहे



ई-साहित्य प्रतिष्ठान esahity@gmail.com